महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाच्या खर्चासाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- मलोआ-१११८/प्र.क्र.३२७/भाग-१/का-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १० जून, २०१९

वाचा:- १. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे पत्र क्र.सीबीडी-०११८/सीआर-०१/२०१८/पाच, दि.१६ ऑक्टोबर, २०१८
२. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.साबांज-२०१५/प्र.क्र.१५२/मिव्य-१, दि.०८ डिसेंबर, २०१८

प्रस्तावना:-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय सद्य:स्थितीत भाडयाच्या जागेवर कार्यरत आहे. यामुळे आयोगाच्या गोपनीय स्वरुपाच्या व संविधानिक स्वरुपाच्या कामकाजास अनेक अडचणी उद्भवत आहेत. तसेच आयोगास जागेच्या भाडयापोटी प्रतिवर्षी सुमारे रु.११.७० कोटी इतका खर्च येत आहे. या बाबी विचारात घेवून शासनाने संदर्भीय शासन निर्णय क्र.२ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास स्वत:च्या मालकीचा स्वतंत्र भूखंड सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथे उपलब्ध करुन दिला आहे. सदर भूखंडावर आयोगासाठी बांधावयाच्या कार्यालयीन इमारतीच्या खर्चाच्या तरतूदीसाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी बांधावयाच्या कार्यालयीन इमारतीच्या खर्चासाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

लेखाशीर्ष (मराठी)		लेखाशीर्ष (इंग्रजी)	
मागणी क्रमांक	ए-९	Demand No.	A-9
४०७० - इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च		4070 – Capital Outlay on Other Administrative Services	
००		00	
०५१-बांधकाम		051-Construction	
(००)(०१)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम. ५३- मोठी बांधकामे संगणक सांकेतांक (४०७००३११)		(00)(01)- Construction of Building for Maharashtra Public Service Commission. 53– Major Works CRC:- (40700311)	

सदरहू शासन निर्णय महालेखाकार, (लेखा व हकदारी)-१, महाराष्ट्र, मुंबई यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ख.वि/चा-१/सामान्य प्रशासन विभाग/यूओआर-२५/२०१९-२०/२२२, दिनांक ३०.०५.२०१९ तसेच नियोजन विभाग अनौ.संदर्भ क्र.७७/१४४३, दि.०८.०५.२०१९ व वित्त विभागाच्या दि.०१.०६.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१०१६१०३४३१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Pandurang Wagh

Digitally signed by Rajendra Pandurang Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b2370430433845720a9c4c8107, serialNumber=7adb1868a49b8719e27d3453044671a8ceddbd04af26dd2089ed03e6b1bd92bd, cn=Rajendra Pandurang Wagh
Date: 2019.06.10 16:17:52 +05'30'

(राजेंद्र वाघ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव(वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव(नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. कार्यासन (व्यय-४, अर्थ-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. कार्यासन (का-१४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (का-८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.